


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ३६१ वा शुक्रवार दि ०८ मे २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# शिट्टी वाजली! थलपती सरकार येण्याचा मार्ग मोकळा; चार पक्षांच्या साथीनं गाठला बहुमताचा आकडा...

**वृत्तसंस्था/ चेन्नई**

तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेलं नाही. त्यामुळे ४ दिवसांपासून सत्ता पेच कायम होता. पण आता हा पेच संपला आहे. काँग्रेससह लहान पक्षांनी टीव्हीकेला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे राज्यात थलपती विजय यांचं सरकार येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तामिळनाडू विधानसभा निवडणुकीचा निकाल सोमवारी जाहीर झाला आहे. दोन वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या टीव्हीके पक्षानं सर्वाधिक १०८ जागा जिंकल्या. द्रमुक आणि अण्णाद्रमुक या प्रस्थापित पक्षांना विजय यांनी धूळ चारली. पण बहुमतापासून टीव्हीके पक्ष दूर राहिला. राज्यात सरकार स्थापनेसाठी ११८ आमदारांचा पाठिंबा गरजेचा आहे. टीव्हीकेच्या १०८ जागा निवडून आल्या आहेत. विजय दोन मतदारसंघांमधून विजयी झाले आहेत. त्यामुळे टीव्हीकेकडे १०७ आमबहुमतासाठी ११८ आमदारांचा पाठिंबा गरजेचा आहे. विजय यांनी राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांची दोनदा भेट घेतली. तेव्हा विजय यांच्याकडे ११३ आमदारांच्या पाठिंब्याचं पत्र होतं. काँग्रेसच्या ५ आमदारांनी टीव्हीकेला पाठिंबा दिला असल्यानं टीव्हीकेचा आकडा ११३ वर पोहोचला. यानंतर आता तीन लहान पक्षांनी टीव्हीकेला समर्थन दिलं आहे. यात डाव्या पक्षांचा समावेश आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि व्हीसीके यांनी टीव्हीकेला पाठिंबा जाहीर केला आहे. या तिन्ही पक्षांना प्रत्येकी दोन जागांवर यश मिळालं आहे. त्यामुळे त्यांच्याकडे एकत्रित ६ आमदारांचं बळ आहे. या पाठिंब्याच्या जोरावर टीव्हीकेनं बहुमताचा आकडा गाठला आहे. त्यामुळे शिट्टीचं चिन्ह घेऊन पहिल्याच निवडणुकीत शंभरहून अधिक जागा आणणाऱ्या विजय यांच्या पक्षाचं सरकार येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्यात गेल्या चार दिवसांपासून सत्ता स्थापनेसाठी वेगवान घडामोडी सुरु होत्या. विजय यांनी राज्यपालांची दोनदा भेटली.



त्यांना ११३ आमदारांच्या स्वाक्षऱ्यांचं पत्रदेखील दिलं. पण राज्यपालांनी त्यांना ११८ आमदारांच्या पाठिंब्याचं पत्र घेऊन येण्यास सांगितलं. आधी बहुमतासाठी आवश्यक असलेल्या आमदारांचा आकडा दाखवा. त्यांच्या स्वाक्षऱ्यांचं पत्र द्या. मगच शपथविधी होईल, अशी भूमिका राज्यपालांनी घेतली होती.

# जळगावात सह दुय्यम निबंधक सुनील चव्हाण, शिवसेना अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुख मुस्ताक भाईजान सह सहा जणांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल...

**जनसंचलन/ जळगाव जामोद**

जळगाव जामोद शहरातून एक मोठी आणि खळबळजनक बातमी समोर येत आहे. ज्यांच्यावर मालमत्ता नोंदणीची कायदेशीर जबाबदारी असते, तेच आता फसवणुकीच्या जाळ्यात अडकले आहेत. जळगाव जामोदचे सह दुय्यम निबंधक सुनील पंढरी चव्हाण यांच्यासह ६ जणांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला असून, संपूर्ण महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे.तर हे प्रकरण आहे जमिनीच्या वर्गात बदल करून केलेल्या फसवणुकीचे. जळगाव जामोद येथील रहिवासी मनीषकुमार भिकमचंद गांधी यांनी ही तक्रार दिली आहे. शहरातील शिट नंबर १५ सी, प्लॉट नंबर ५६ ही ब वर्ग प्रकारची जमीन आरोपींनी फिर्यादीला विक्रीसाठी दाखवली होती.या जमिनीच्या खरेदीसाठी शासनाची परवानगी आवश्यक असताना, ५ लाख ७० हजार रुपये घेऊन सौदाचिठ्ठी करण्यात आली. मात्र, ही परवानगी प्रलंबित असतानाच आरोपींनी संगनमत करून एक मोठा डाव साधला. शासकीय कागदपत्रांमध्ये चक्क कॉम्प्युटरद्वारे फेरफार करण्यात आला! ब वर्ग जमिनीचे रूपांतर अ वर्ग धारणधिकारात दाखवून आखीव पत्रिकेत बदल केले गेले. धक्कादायक बाब म्हणजे, या बेकायदेशीर प्रक्रियेकडे दुर्लक्ष करत किंवा संगनमत करून, सह दुय्यम निबंधक सुनील चव्हाण यांनी या मालमत्तेचे खरेदीखत आरोपी मो. मुस्ताक याच्या नावे करून दिले.या प्रकरणी बुलढाणा पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार एकूण ६ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत:१) अ. हबीब मो. मुसा,२) मो. शरीफ मो. मुसा,३) मो. मुस्ताक मो. इसा उर्फ मुस्ताक भाईजान,४) एजाज मुस्ताक देशमुख,५) मो. साबीर अ. हबीब,आणि सह दुय्यम निबंधक सुनील पंढरी चव्हाण.या सर्वांवर कलम ४२०, ४६८, ४७१ आणि ३४ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस निरीक्षक नितीन कुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल संजय वेरूळकर या गुन्ह्याचा पुढील तपास करत




आहेत.शासकीय अधिकाऱ्याचा या फसवणुकीत सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने आता महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणात अजून किती मोठे मासे गळाला लागणार, याकडे आता संपूर्ण जळगाव जामोद तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# तापतोय सूर्य आणि राजकारणही!

## संपादकीय लेख

विदर्भात सध्या उन्हाचा कहर सुरू आहे. इकडची दोन-चार शहरे कधी जगात, तर कधी भारतात नंबर एकची उष्ण ठरत आहेत. विधान परिषदेच्या निवडणुकीने राजकीय तापमानही वाढविले आहे. कारण आहे, प्रहारचे नेते ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांना एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून मिळालेली उमेदवारी, म्हणजेच आमदारकी. अभिनव आंदोलनांनी राज्यभर प्रसिद्ध पावलेले कडू हे मूळचे शिवसैनिक. विद्यार्थी सेनेपासून त्यांनी राजकीय कारकीर्द सुरू केली. कर्जाच्या परतफेडीसाठी बँकांनी शेतकऱ्यांची ट्रॅक्टर जप्ती चालवली तेव्हा त्यांनी केलेले ङ्गसुतळी अॅटमबॉम्बफ आंदोलन खूप गाजले. त्यानंतर त्यांनी अनेक लक्षवेधी आंदोलने केली. कधी अर्धे शरीर जमिनीत गाडून ङ्गअर्ध दफनफ आंदोलन केले, कधी शेतकऱ्यांसाठी रुमणे आंदोलन, तर कधी सामूहिक मुंडण केले. दारूबंदी व्हावी म्हणून दारूच्या दुकानापुढे दूध वाटले. विधिमंडळाच्या एका हिवाळी अधिवेशनात त्यांनी उंच जलकुंभावर चढून ङ्गशोले स्टाइलफ आंदोलन केले. तत्कालीन उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांनी त्या टाकीवर चढून कडूंशी चर्चा केल्यामुळे ते खूपच चर्चेत आले. यांच्या आंदोलनातून ना सोनिया गांधी सुटल्या, ना नरेंद्र मोदी. सोनियांना घर बांधून देण्यासाठी ते गेले होते. नागपूर ते वडनगर अशी ङ्गआसूड यात्राफ काढून मोदींच्या वडनगरात जाऊन ते रक्तदान करून आले. आता त्यांचे शिवसेनेत जाणे, स्वत:चा प्रहार जनशक्ती पक्ष शिवसेनेत विलीन करणे हा सध्या राजकीय संशोधनाचा विषय बनला आहे. भाजपचे आमदार म्हणतात, त्यांच्यावरील गुन्ह्यांवर कारवाई होऊ नये म्हणून ते सत्ताशरण झाले. कुणाला वाटते, भाजपला झटका देण्यासाठी शिंदेंनी सोडलेला हा बाण आहे. भाजप आणि कडूंची खेटाखेटी ही आजची नव्हे. १९९९ साली भाजप-शिवसेनेची युती असताना कडू हे शिवसेनेचे तालुका प्रमुख होते. ते भाजपचे नेते विनायकराव कोरडे यांच्या विरोधात अपक्ष लढले. मतविभाजन होऊन काँग्रेसचा विजय झाला. कोरडे समर्थकांनी ङ्गमातोश्रीफकडे आग्रह धरून कडूंवर कारवाई करायला लावली. कडूंनी धनुष्य सोडला आणि ङ्गप्रहारफ संघटना सुरू केली. सलग चार वेळा ङ्गप्रहारफचे आमदार म्हणून निवडून आले. उद्धव ठाकरेंच्या मंत्रिमंडळात ते राज्यमंत्री होते. गुवाहटीच्या बंडात सहभागी होऊनसुद्धा त्यांना पुन्हा मंत्रिपद मिळाले नाही. खोक्यांचे आरोप झाले. ही त्यांची नाराजी होती. त्यांनी दिव्यांगासाठी चांगले काम केले. त्याच वेळी, कधी लाच मागणाऱ्याला मार, कधी अधिकाऱ्याच्या कानाखाली वाजव, कधी मंत्रालयात मारहाण कर, असे कायदा हातात घेणारे प्रतापही त्यांच्या नावे जमा आहेत. ङ्गशिंदेंना मुख्यमंत्री करेपर्यंत स्वस्थ बसणार नाही,फ असे म्हणत कडूंनी भाजपला डिवचले. ङ्गआता विधानसभेत जिंकण्याची संधी नसल्याने



कडू परिषदेवर गेले,फ असा टोला भाजप आमदारांनी लगावला आहे. ङ्गप्रहारफचा गावोगावी पसरलेला कार्यकर्ता अस्वस्थ आहे. स्थानिक निवडणुकांत भाजप-सेनेची युती झाली तर ङ्गप्रहारफ कुठे असेल, शिवसेना आणि ङ्गप्रहारफ कार्यकर्त्यांत जागांवरून संघर्ष झाला तर कौल कुणाला मिळेल, असे काही प्रश्न त्यांच्या समोर आहेत. ङ्गजनतेने संधी दिली असती तर नेत्याकडे गेलो नसतो,फ असे म्हणत कडूंनी जनतेलाही बोल लावला आहे. राजकारण करताना, लोक अंगावर घेताना कडूंनी त्यांच्यातील आंदोलनकर्ता गमावू नये, असे सामान्य जनतेला वाटते. अन्यथा, ङ्गबच्चू कडू सब का भिडूफ ही त्यांच्याबद्दलची भावना ङ्गबच्चू कडू सब को भिडूफ अशी होऊ शकेल.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# 'विकासाच्या बाबतीत आता नाशिक थांबणार नाही'

## कुंभ उद्योग संगम आणि नाशिक गुंतवणूकशिखर परिषदेचा मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत समारोप

**नाशिक/वृत्तसंस्था**

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या अनुषंगाने धार्मिक आणि आध्यात्मिक महत्व असलेले नाशिक शहर यापुढील काळात विकासाचे ग्रोथ इंजिन ठरेल, विकासाच्या बाबतीत आता नाशिक थांबणार नाही, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. क्षमता आणि सुविधांद्वारे येथील औद्योगिक विकासाला खऱ्या अर्थाने बळ मिळेल आणि गुंतवणुकीच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

हॉटेल ताज येथे आयोजित कुंभ उद्योग संगम आणि नाशिक गुंतवणूक शिखर परिषद २०२६ च्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, उद्योगमंत्री उदय सामंत, शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, खासदार शोभा बच्छाव, महापौर हिमगौरी आहेर- आडके, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, उद्योग विभागाचे विकास आयुक्त दीपेंद्र कुशवाह आदी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत विविध ३०० हून अधिक उद्योजकाच्या सोबत १३ हजार १९० कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले. त्यातून ३२ हजार इतकी रोजगार निर्मिती होणार आहे.

विकासाची मोठी संधी असलेले नाशिक हे शहर असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, जिल्ह्यात गुंतवणूक व्हावी यासाठीचा कुंभ उद्योग संगम उपक्रम अतिशय चांगला आहे. या गुंतवणूक परिषदेच्या माध्यमातून नाशिक विकासाच्या मुख्य धारेत पुन्हा आला आहे. मागील तीन वर्षापासून आपण जिल्हा केंद्रित गुंतवणूक परिषद घेण्यात येत आहे. त्यामध्ये आतापर्यंत एकूण ३१ हजार ९४५ कोटी रुपयांची गुंतवणूक नाशिक जिल्ह्यात झाली आहे. त्यातून ६६ हजार जणांना रोजगार उपलब्ध होणार आहेत. आतापर्यंत झालेल्या सामंजस्य करारापैकी ७७ टक्के कार्यान्वित झाले आहेत. यामध्ये, इलेक्ट्रॉनिक्स, कृषीआधरित सेवा, ऑटोमोबाईल, वस्त्रोद्योग, सेवा क्षेत्रासह इतर उद्योगातील गुंतवणुकीचा समावेश असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.




नाशिक जिल्ह्यातही अनेक उद्योग समूहानी गुंतवणूक करण्यास स्वारस्य दाखवले असून त्यासाठी त्यांना आवश्यक जमीन उपलब्ध होणे गरजेचे आहे. महिंद्रा अँड महिंद्रा सारखी कंपनी नाशिकमध्ये गुंतवणूक करत आहे, जागा उपलब्ध झाल्यास या उद्योगाची त्वरित सुरूवात करण्यात येईल. याशिवाय, रिलायन्स, लार्सन अँड टुब्रो यासारख्या उद्योगांनी गुंतवणूक केली आहे. अनेक उद्योगसमूह येथे उद्योगविस्तारासाठी इच्छुक असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. गेल्या दोन वर्षात ५७ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक नाशिकसाठी आली असून दावोस येथे झालेल्या परिषदेत नाशिक जिल्ह्यासाठी १२ हजार कोटींची गुंतवणूक राज्य शासनाने आणल्याचे त्यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात आता उद्योगाचे नवीन मॅग्नेट तयार झाले आहेत. उत्तर महाराष्ट्रामध्ये नाशिक हे नवे मॅग्नेट तयार झाले आहे. त्यामुळे नाशिकचा विकास आता थांबणार नाही. अहिल्यानगर, जळगाव, धुळे, नंदुरबार हेही उद्योगासाठी गुंतवणुकीचे ग्रोथ इंजिन होत आहेत. याशिवाय, मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालना येथे मोठे उद्योग येत आहेत. विदर्भात नवीन मॅग्नेट तयार झालेत. विकासाचा समतोल साधण्याचा प्रयत्न राज्य शासन करीत असल्याचे त्यांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले, महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था करायची आहे. त्यामध्ये भौगोलिक समतोल असावा, यादृष्टीने काम सुरू आहे. सुरुवातीला केवळ मुंबई, पुणे आणि महानगर प्रदेश केंद्रित विकास असे धोरण होते. राज्य शासनाने जिल्ह्याला विकासाचे केंद्र केले पाहिजे, अशी भूमिका घेतली. जिल्ह्याच्या क्षमतांचा आणि सुविधांचा उपयोग केला पाहिजे. केवळ मोठ्या उद्योगांसोबत लघु उद्योगांना प्राधान्य देण्याचे काम राज्य शासनाच्या माध्यमातून होत असल्याचे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, उद्योजकांनासाठी उद्योगस्नेही धोरण आखले. विविध परवानग्या एक छताखाली आणल्या. त्यासाठी मैत्री सारखी सुविधा निर्माण करण्यात आली असून त्यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास वाढला आहे. मैत्रीद्वारे ३ लाखाहून अधिक अर्जांवर कार्यवाही करण्यात आली आहे. राज्यात सर्वदूर उद्योग सुरू होत आहेत. महाराष्ट्र ही आता स्टार्टअप्सची राजधानी झाले आहे. राज्यात ३० हजाराहून अधिक स्टार्टअप्सची सुरुवात झाली आहे. शेती क्षेत्रात स्टार्ट अप्सने क्रांती केली आहे याशिवाय, एक 'जिल्हा एक उत्पादन' मधे मूल्यवर्धन करून राज्य शासन त्या माध्यमातून ब्रॅण्डिंग करत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

# दिव्यांग कर्ज योजनेची मर्यादा वाढविण्यासाठी प्रस्ताव तयार करा : मंत्री अतुल सावे

**मुंबई/वृत्तसंस्था**

दिव्यांगांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी कर्ज योजनांची व्याप्ती वाढविणे आवश्यक आहे. राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कर्ज वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करून इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या व्याज परतावा योजनेच्या धर्तीवर वैयक्तिक थेट कर्ज योजनेअंतर्गत दिव्यांग लाभार्थ्यांना कर्ज मर्यादा वाढविण्यासाठी सविस्तर प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे मंत्री अतुल सावे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

मंत्रालयात मंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली दिव्यांग सक्षमीकरण विभागाचा आढावा घेण्यात आला. या बैठकीस दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे सचिव माणिक गुरसाळ, आयुक्त सत्यजीत बडे तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंत्री अतुल सावे म्हणाले, सध्या दिव्यांगांसाठी वैयक्तिक कर्जाची मर्यादा ५० हजार रुपये असून, ती वाढवून पाच लाख रुपयांपर्यंत करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने पर्यावरणपूरक फिरत्या वाहनावरील दुकान (ई-व्हेईकल) मोफत उपलब्ध करून देण्याच्या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी. या योजनेअंतर्गत सुमारे ३.७५ लाख रुपये किंमतीचे ई-व्हेईकल लाभार्थ्यांना देण्यात येणार आहे. दिव्यांगांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी जिल्हा वार्षिक योजनेतील किमान एक टक्का निधी राखीव ठेवण्याबाबत मार्गदर्शक सूचना तातडीने तयार करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

# लीज प्रॉपर्टी मधील जागा कामगारांना निर्वाहासाठी देण्याचे महसूल मंत्र्यांचे निर्देश

**मुंबई/वृत्तसंस्था**

महाबळेश्वर येथे शासनाच्या जागेवरील लीज प्रॉपर्टीमध्ये वर्षानुवर्षे ६० कामगार कुटुंबे काम करत आहेत. या प्रॉपर्टीवरील लीज संपल्यामुळे ही कुटुंबे बेघर होऊ शकतात. यामुळे २५ मार्च २०२६ च्या शासन निर्णयानुसार सर्वेक्षण करुन पात्र कुटुंबांना नियमानुसार जागा उपलब्ध करुन देण्याबाबत प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

महाबळेश्वर येथील विविध प्रश्नांबाबत महसूल मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. यावेळी महाबळेश्वर येथील लीज प्रॉपर्टीमध्ये काम करणाऱ्या कुटुंबीयांचे प्रतिनिधी उपस्थित होते. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, शासनाने सर्वांसाठी घरे ही संकल्पना मांडली असून त्यासाठी २५ मार्च रोजीच्या शासन निर्णयानुसार २०११ पूर्वी शासकीय जागेवर असलेले अतिक्रमण नियमानुकुल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या निर्णयाचा आधार घेऊन महाबळेश्वर येथील लीज




प्रॉपर्टीमध्ये वर्षानुवर्षे काम करणाऱ्या कामगारांचे सर्वेक्षण करुन पात्र ठरणाऱ्या कुटुंबीयांना नियमानुसार देय ठरणाऱ्या जागेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनी शासनाकडे सादर करावा, असे निर्देश त्यांनी दिले. या निर्णयामुळे लीज प्रॉपर्टी मध्ये वर्षानुवर्षे काम करणाऱ्या कामगारांच्या कुटुंबीयांना दिलासा मिळणार आहे.

# अमेरिका-इराण दरम्यान सामंजस्य करार अंतिम टप्प्यात

**वॉशिंग्टन/वृत्तसंस्था**

अमेरिका आणि इराण हे युद्ध समाप्तीच्या समीप आले असून अमेरिकन अधिकारी आणि संबंधित सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकेने इराणसोबतचे युद्ध संपवण्यासाठी आणि व्यापक अणू चर्चेसाठी एका पानाचा सामंजस्य करार करण्याच्या अंतिम टप्प्यात आहे.

प्रस्तावित आराखड्यात १४ मुद्द्यांचा समावेश असलेला एक पानाचा सामंजस्य करार तयार करण्यात आला आहे. याचा मुख्य उद्देश तात्काळ युद्धबंदी लागू करणे आणि पुढील ३० दिवसांत पूर्ण कराराला अंतिम स्वरुप देणे असा आहे. या अंतर्गत इराण आपल्या युरेनियम संवर्धन कार्यक्रमाला अल्पकाळासाठी स्थगिती देण्यास तयार झाला आहे. त्या बदल्यात, अमेरिका इराणवरील निर्बंध हटवण्याची आणि इराणची अब्जावधी डॉलर्सची गोठवलेली मालमत्ता मुक्त



करण्याची प्रक्रिया सुरू करेल. दोन्ही देश 'होर्मुज सामुद्रधुनी'मधील तणाव कमी करण्यासाठी आणि सागरी जलमार्गातील अडथळे दूर करण्यासाठी एकमेकांना सहकार्य करतील. अहवालात असेही नमूद करण्यात आले आहे की, अनेक महत्त्वाच्या अटी पुढील चर्चेवर अवलंबून आहेत. त्यामुळे पुन्हा संघर्ष किंवा प्रदीर्घ अनिश्चिततेचा धोका कायम आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुज सामुद्रधुनीतील लष्करी हालचाली कमी करण्याचा घेतलेला अलीकडील निर्णय याच राजनैतिक प्रयत्नांचा परिणाम आहे. याचे नेतृत्व अमेरिकन दूत स्टीव्ह विटकॉफ आणि जेरेड कुशनर करत आहेत, जे थेट आणि मध्यस्थांच्या माध्यमातून तेहरानच्या संपर्कात आहेत.

# टीबी मुक्त भारत अभियानात सहभागी होण्याची राज्यपालांची सूचना

**मुंबई/वृत्तसंस्था**

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी क्रीडा विभाग, क्रीडा व युवक कल्याण आयुक्त, एनसीसी महाराष्ट्र, माय भारत, महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस व गाईडस आदी संस्थांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची लोक भवन येथे बैठक घेऊन सर्व संस्थांना राज्यातील टीबी मुक्त भारत अभियानात सहभागी होण्याची सूचना केली.

राज्यात एनसीसीचे १.२१ लाख कॅडेट्स, १७ लाख स्काऊट्स व गाईड्स तसेच माय भारत उपक्रमात १३.५० लाख युवा स्वयंसेवक असून ते सर्व टीबी मुक्त भारत अभियानात सहभागी झाल्यास अभियान राज्यात यशस्वी होईल असे राज्यपालांनी सांगितले. यावेळी अधिकाधिक युवकांना निक्षयमित्र बनवण्याची देखील सूचना राज्यपालांनी केली. क्रीडा विभागाने आंतरराष्ट्रीय क्रीडाप्रकारांशिवाय राज्यातील पारंपरिक क्रीडा प्रकारांना चालना द्यावी अशी सूचना राज्यपालांनी विभागाला केली. यावेळी राज्यपालांनी महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट - गाईड संस्थेला राज्यात स्काऊट गाईडचे राष्ट्रीय शिबीर (जांबोरी) आयोजित करावे. स्काऊट व गाईड चळवळीमध्ये नवचैतन्य देण्यासाठी आकर्षक प्रशिक्षण कार्यक्रम आखावा अशी सूचना राज्यपालांनी यावेळी केली. महाराष्ट्र एनसीसीने राज्यातील कार्याचा विस्तार करण्याचे ठरवले असून त्याकरिता एनसीसीच्या मुंबई, नागपूर व छत्रपती संभाजीनगर येथे प्रशिक्षण केंद्र स्थापन करावयाचे असल्याचे सांगून या कार्यात शासनाकडून मदत अपेक्षित असल्याचे एनसीसीचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल विवेक त्यागी यांनी राज्यपालांना सांगितले.

# गहू खरेदीला बोलावलं, मग पिस्तूल रोखून लुटलं; पोलिसांनी दरोडेखोरांना फिल्मी स्टाईलने पकडलं..

**बारामती/वृत्तसंस्था**

बारामती एमआयडीसी येथे गहू देण्याच्या बहाण्याने बोलावून फिर्यादीला पिस्तूलाचा धाक दाखवून मारहाणं करत अंगावरील सोन्या, चांदीचे दागिने पळवून नेणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात पोलिसांना यश आले आहे. बारामती तालुका पोलिसांनी चार आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत पिस्तूल, जिवंत काडतुसे, दागिने, रोख रक्कम आणि गुन्ह्यात वापरलेली कार असा मोठा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.रवी संजय माने (वंजारवाडी, बारामती), श्रीकांत अर्जुन घुले (ढेकळवाडी, बारामती), अभिषेक भाऊसो ठोंबरे (ढेकळवाडी, बारामती), अतुल मोहन भोलणकर (वंजारवाडी, बारामती) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. या प्रकरणी सूरज सरजेराव गावडे (वय २७) यांनी फिर्याद दिली आहे.याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सूरज सरजेराव गावडे (वय २७) (रा. तासगाव, जि. सांगली) यांना ४ मे २०२६ रोजी बारामती एमआयडीसी येथे गहू नेण्यासाठी बोलावून



त्यांना पिस्तूलाचा धाक दाखवत मारहाण केली व त्यांच्या अंगावरील सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम आणि वाहन हिसकावून घेतले. या प्रकरणी बारामती तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि माहितीदारांच्या मदतीने आरोपींचा माग काढण्यात आला. विविध ठिकाणी पाठलाग करत अखेर सापळा रचून आरोपींना ताब्यात घेण्यात आले. अटकेतील आरोपींमध्ये

रवी संजय माने, श्रीकांत अर्जुन घुले,अभिषेक भाऊसो ठोंबरे अतुल मोहन भोलणकर यांचा समावेश आहे. आरोपींकडून दोन बनावट पिस्तुले, तीन जिवंत काडतुसे, सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम, गुन्ह्यात वापरलेली वेगनार कार आणि मोबाईल फोन जप्त करण्यात आले. पोलिसांच्या चौकशीत या टोळीने यापूर्वीही अशा प्रकारचे गुन्हे केल्याचे समोर येत असून, पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव व त्यांच्या पथकाने केली.सिन्नरमास कंपनी जवळ समोरून भिगवण पोलिस आणि मागून वालचंदनगर व बारामती पोलिसांनी घेराव घालत पाठलाग तीव्र केला. अखेर रात्री सुमारे ८.५० वाजता तीन आरोपींना गाडीसह ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर चौथा आरोपी अतुल भोलणकर याला त्याच्या घरातून अटक करण्यात आली. या कारवाईदरम्यान आरोपींकडून ७,५०,००० रु चे सोन्या चांदीचे दागिने, घड्याळ, जिवंत काडतूस सह दोन पिस्तूल, ६५,००० रु रोख रक्कम असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## पुण्यातील पर्वती प्रकरणातील चिमुकलीने आई-वडिलांना सांगितली आपबिती

**पुणे/वृत्तसंस्था**

स्नेहल निमगिरे, पुणे : पुण्यामधील भोर तालुक्यातील नसरापूरमध्ये झालेल्या संतापजनक घटनेला काही दिवसही उलटत नाही, तोवर शहरातील पर्वती भागात घडलेल्या धक्कादायक प्रकरणानं सगळ्यांनाच हादरवून टाकलं आहे. आई-वडील कामावर जाणारे, घरात एकटी राहणारी चिमुकली मुलगी आणि याचाच गैरफायदा घेत स्वतःच्याच नराधम आजोबाने तिच्यावर जबरदस्ती केल्याचा प्रयत्न केल्याचं समोर आलं आहे. याप्रकरणी आरोपी आजोबाला अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरु आहे. याचदरम्यान, पीडित चिमुकलीच्या आई-वडिलांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना या घटनेबाबत एक मोठा खुलासा केला आहे.घटनेच्या दिवशी आई नेहमीप्रमाणे कपड्यांच्या दुकानात कामाला गेली होती, तर वडील रिक्षा चालवण्यासाठी बाहेर होते. संध्याकाळी घरात मुलगी एकटीच होती. रात्री साधारण 9 वाजता आई घरी आली, तेव्हा मुलगी खूप घाबरलेली दिसली. रडत-रडत तिने आईला सांगितलं, 'तुम्ही कामाला गेल्यावर तात्या मला ओढून नेत होते. माझे कपडे काढले. अंगावर नखं मारली', हे ऐकून आईच्या पायाखालची जमीनच सरकली. आईने सांगितलं की, 'मुलीच्या अंगावर खरचटल्याच्या खुणा होत्या आणि ती पूर्ण घाबरलेली होती. तेव्हा हा सगळा प्रकार लक्षात आला.धक्कादायक म्हणजे, मुलीने यापूर्वीही असाच प्रकार झाल्याचं सांगितलं. 'आधी पण तात्या असंच करत होते. पण मी पळून जायचे', असं चिमुरडीने तिच्या आई-वडिलांना बोलताना सांगितलं, आणि भीतीमुळे ती आतापर्यंत काहीच बोलली नव्हती. वडिलांनी सांगितलं की, 'मी रिक्षाचालक आहे. त्यावेळी मी बाहेर होतो. वर्षभरापूर्वीही आरोपीने घरातून मोबाईल चोरी केला म्हणून मी त्याला घरातून हाकललं होतं. तो जवळच राहत होता, हे आम्हाला माहीत नव्हतं.' आरोपीने मुलीला खाऊ देऊन तिचा विश्वास जिंकला आणि घरात कोणी नसताना हा प्रकार केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

## जुळ्या बहीण-भावाने तलावात गमावला जीव

**जुन्नर :** तळेरान (ता. जुन्नर) येथे पाझर तलावात बुडून ११ वर्षीय जुळ्या बहीण-भावाचा मृत्यू झाला. गेल्याच आठवड्यात बल्लाळवाडी येथे शेततळ्यात बुडून दोन मुलांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. आठवडाभरात चार मुले बुडाल्याने तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे. श्रावणी साबळे आणि गणेश साबळे अशी मृत्यू झालेल्या बहीण-भावाची नावे आहेत. दोन्ही मुले आदिवासी प्रकल्पाच्या घोडेगाव येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये निवासी शाळेत शिकत होती. उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी ते घरी आले होते. मुलांचे वडील मोलमजुरी करून उदरनिर्वाह करीत असून, त्यांना मोठ्या तीन मुली आणि धाकटी जुळी बहीण-भावंडे अशी पाच मुले होती.मृत मुलांची मोठी बहीण कपडे धुण्यासाठी तळेरानच्या वसईवाडी पाझर तलावावर गेली होती. त्यानंतर ही दोन्ही भावंडे तिच्या पाठोपाठ तळ्यावर गेली. तळ्यातील पाण्यात उतरली असता, अंदाज न आल्याने दोघे बुडाली. हे पाहून मोठ्या बहिणीने आरडाओरडा केला. पोहता येत नसल्याने ती मदत करू शकली नाही. जवळ कोणी नसल्याने मुलांना वाचवता आले नाही.

## अख्खं गाव गाढ झोपेत, जिथे कृत्य केलं 'त्या' गोठ्यात पोलिसांनी नराधम कांबळेला नेलं

**पुणे/वृत्तसंस्था**

पुणे जिल्ह्यामधील भोर तालुक्यातील नसरापूरमध्ये चिमुकलीवर झालेल्या संतापजनक प्रकार आणि नंतर तिला संपवल्याच्या घटनेनं संपूर्ण पुणे जिल्ह्यासह अख्खा महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणामुळे नागरिकांचा संताप वाढत असताना पुणे पोलिसांनी तपास आता अधिक वेगाने सुरू केला आहे. पोलिसांनी आरोपीविरुद्धचे सर्व पुरावे अन् खडानखडा माहिती गोळा केले असून आता फास्ट ट्रॅक कोर्टात हे प्रकरण चालवणार आहे. येत्या 10 दिवसात चार्टशीट दाखल होईल, अशी अपेक्षा आहे. अशातच आता पुणे पोलिसांनी गुप्तपणे एक पंचनामा केल्याची माहिती मिळाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी अत्यंत सस्पेन्स पद्धतीने ही तपास मोहीम राबवली आहे. मध्यरात्रीच्या सुमारास आरोपीला सोबत घेऊन पोलीस नसरापूर येथील घटनास्थळी ठिकाणी दाखल झाले. या कारवाई दरम्यान पोलिसांनी संपूर्ण परिसराची बारकाईनं पाहणी केली असून, घटनेच्यावेळी नक्की काय घडलं असावं? याचा अंदाज घेण्याचा प्रयत्न केला आहे. ज्या गोठ्यात नराधम भीमराव कांबळेनं त्या लेकीसोबत संतापजनक कृत्य केलं, त्या गोठ्यामध्ये नेऊन पोलिसांनी आरोपीची सखोल चौकशी केली.घटनेच्यावेळी आरोपी कुठे उभा होता? त्याने नक्की कशाप्रकारे हा गुन्हा केला? या सर्व बारीकसारीक गोष्टींचा पंचनामा पोलिसांनी घटनास्थळी केला. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पोलिसांनी हा निर्णय घेतला अन् आरोपीला गोठ्यात नेलं होतं. त्यावेळी पोलिसांनी आरोपीवर हल्ला होऊ नये, याची काळजी देखील घेतली. यावेळी अख्खं गाव गाढ झोपेत होतं. त्यामुळे कुणालाच याची कुणकुण लागली नाही.दरम्यान, ही लहान मुलगी आपल्या आई-वडिलांसोबत पुण्यात राहत होती. शाळेला सुट्टी लागल्यानं ती नसरापूर येथे आपल्या आजीच्या घरी गेली होती. त्यावेळी 1 मे रोजी तिच्यावर जबरदस्ती करुन तिला संपवण्यात आलं.

## बायकोच्या खोट्या साक्षीने भीमराव निर्दोष सुटला, पाठिंब्यामुळे अधिक विकृत

**पुणे/वृत्तसंस्था**

पुणे ग्रामीण पोलिस व तपासपथकाने साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करून निर्घृण हत्या केलेल्या जागेची स्थळपाहणी बुधवारी केली. आरोपी भीमराव कांबळेला घेऊन तपास पथक नसरापूर येथे बुधवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास आले होते. या वेळी अधीक्षक संदीपसिंग गिल यांच्यासह तपास पथकातील अधिकारी व मोठा पोलिस बंदोबस्त होता.आरोपीच्या सुरक्षिततेच्या कारणास्तव अत्यंत गोपनीय पद्धतीने, मोठ्या पोलिस बंदोबस्तात ही पाहणी करण्यात आली. अवघ्या दहा मिनिटांमध्ये पाहणी करून पथक पुन्हा पुण्याकडे रवाना झाले. दरम्यान घटनेच्या दिवशी मद्यप्राशन केल्यामुळे आपल्याला काहीच आठवत नसल्याचे कांबळेने पोलिसांना सांगितले.



ज्या गोठ्यात घटना घडली त्या गोठ्याच्या मालकाकडे आरोपी दोन महिने मोलमजुरी करत होता. त्याच गोठ्यात दोन महिने झोपत होता. त्यामुळे आरोपीने अतिशय विचारपूर्वक हे निर्घृण कृत्य केल्याचे तपासात पुढे आले आहे. संबंधित गोठामालकाची पोलिसांनी कसून चौकशी केली आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस निरीक्षक विजयमाला पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.माजी आमदार संग्राम थोपटे, खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह नसरापूरचे सरपंच, उपसरपंच इतर मान्यवरांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेऊन आरोपीला कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी केली. पीडित मुलीच्या कुटुंबाला शासकीय मदत, नोकरी देण्याची मागणी केली. न्यायिक कामासाठी सरकारी वकील म्हणून उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करावी, अशीही मागणी केली.बायको व कुटुंबाच्या पाठिंब्यामुळे कांबळेची प्रवृत्ती अधिक विकृत झाल्याचा आरोप साळवड्यातील ग्रामस्थांनी केला आहे. १९९८ मध्ये कोयत्याचा धाक दाखवून गावातील एका ज्येष्ठ महिलेवर कांबळेने अत्याचार केला होता. सदरच्या खटल्यात आरोपीच्या पत्नीने जमीन विकून त्याला मदत केली होती; तर २०१५ मधे जवळच्या नात्यातील अल्पवयीन मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न केला. त्यातून ती मुलगी सुटली. न्यायालयात खटला चालला, परंतु त्या वेळेस न्यायालयात खोटी साक्ष देऊन पत्नीने मदत केली. त्यामुळे दोन्ही गुन्ह्यांतून तो निर्दोष सुटला. त्यामुळेच अशा प्रकारचे गुन्हे करण्यात तो सराईत झाल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.या आरोपीचे वकीलपत्र घेण्यास भोर व राजगड वकील संघटनेने नकार दिला आहे, अशी माहिती भोर वकील संघटनेचे अध्यक्ष दत्तात्रेय उरणकर यांनी दिली.


माणुसकीला काळिमा फासणारी घटना असल्यामुळे आरोपीला कठोर शिक्षा होण्यासाठी संघटना सहकार्य करणार आहे. कोणीही भीमराव कांबळेचे वकीलपत्र घेऊ नये, असा ठराव संघटनेने केला आहे. या ठरावाला पुणे बार असोसिएशनने पाठिंबा दिला असल्याचे उरणकर यांनी सांगितले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# IPL चा अंतिम सामना अहमदाबादमध्ये होणार

## आयपीएल २०२६ प्लेऑफचे वेळापत्रक जाहीर..






■ मुंबई, वृत्तसंस्था :

बीसीसीआयने आयपीएल २०२६ च्या प्लेऑफ आणि फायनलच्या वेळापत्रकात मोठा बदल केला आहे. बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमकडून फायनलचे यजमानपद काढून घेण्यात आले आहे. आता आयपीएलच्या यंदाच्या हंगामातील अंतिम सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवला जाणार आहे.

बीसीसीआयने जाहीर केलेल्या वेळापत्रकात पुढील लीग सामन्यांच्या तारखा आणि ठिकाणे नमूद केलेली नव्हती. आता क्वालिफायर आणि एलिमिनेटर सामन्यांच्या ठिकाणांसोबतच तेही उघड झाले आहे. बीसीसीआयने मंगळवारी प्लेऑफचा तपशील जाहीर केला. ५ मे पर्यंत आयपीएल २०२६ मध्ये ४८ सामने खेळले गेले आहेत. ७० सामन्यांनंतर प्लेऑफ खेळले जातील. आयपीएल २०२६ चा पहिला प्लेऑफ सामना, क्वालिफायर एक २६ मे रोजी धर्मशाला येथील एचपीसीए स्टेडियमवर खेळला जाईल. यामध्ये गुणतालिकेतील अव्वल दोन संघ एकमेकांविरुद्ध खेळतील. त्यानंतर ही स्पर्धा चंदीगड येथील न्यू इंटरनॅशनल क्रिकेट स्टेडियमवर खेळवली जाईल. तिथे २७ मे रोजी एलिमिनेटर आणि २९ मे रोजी क्वालिफायर दोन खेळला जाईल.

साखळी सामन्यांनंतर दोन क्वालिफायर, एक एलिमिनेटर आणि मग अंतिम सामना होईल. तारखा बीसीसीआयकडून नंतर जाहीर केल्या जातील, परंतु असं मानलं जाते की आयपीएलचा अंतिम सामना रविवार, 31 मे रोजी होईल, जेव्हा विजेते घोषित केले जातील.

दरम्यान, अशी बातमी समोर आली आहे की आयपीएलचा अंतिम सामना बंगळूरुच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळला जाणार नाही. अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमला यजमानपदाचे हक्क देण्यात आले आहेत.

आयपीएलचा अंतिम सामना अहमदाबादमध्ये होणार आहे. उर्वरित तीन पैकी या वर्षीचा पहिला क्वालिफायर धर्मशाळा येथे खेळवला जाईल. दुसरा क्वालिफायर आणि एलिमिनेटर न्यू चंदीगडच्या मुल्लानपूर इथे खेळला जाईल. राजकीय कारणांळे बंगळूरुला प्लेऑफच्या कोणत्याही सामन्याचे आयोजन करण्याची संधी देण्यात आलेली नाही.

### लीग टप्प्यातील शेवटचा सामना २४ मे रोजी

इंडियन प्रीमियर लीगच्या या हंगामातील लीग टप्प्याचा शेवटचा सामना २४ मे रोजी खेळला जाईल. हा दिवस रविवार असून, दोन सामने नियोजित आहेत. पहिला सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात खेळला जाईल. दुसरा सामना ईडन गार्डन्सवर केकेआर आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात खेळला जाईल. यासह लीग टप्पा संपेल. १० पैकी सहा संघ स्पर्धेतून बाहेर पडतील, ज्यामुळे विजेतेपदाच्या शर्यतीत केवळ चार संघ शिल्लक राहतील.

## विनेशला डोपिंग एजन्सीची नोटीस

■ मुंबई /वृत्तसंस्था

नवी दिल्ली : डोपिंग चाचणीसाठी निश्चित वेळ आणि ठिकाणी उपस्थित नसल्यामुळे १० ते १२ मे दरम्यान गोंडा येथे होणाऱ्या सीनियर ओपन रँकिंग स्पर्धेपूर्वी विनेश फोगाटला इंटरनॅशनल टेस्टिंग एजन्सीने नोटीस बजावली आहे. गेल्या १२ महिन्यांत ही तिची पहिली अशी चूक आहे. या इशाऱ्याचा तिच्या आगामी स्पर्धेत भाग घेण्यावर कोणताही परिणाम होणार नाही. परंतु नियमांनुसार, भविष्यात अशा आणखी दोन चुका झाल्यास, तिच्यावर दोन वर्षांची बंदी घातली जाऊ शकते.

१८ डिसेंबर रोजी चाचणीसाठी बंगळुरूमध्ये विनेश फोगाट उपस्थित नव्हती इंटरनॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या नोटीसनुसार, हे प्रकरण १८ डिसेंबर २०२५ चे आहे. डोपिंग कंट्रोल ऑफिसर विनेश फोगाटने दिलेल्या बंगळूरुच्या पत्त्यावर पोहोचले होते, परंतु ती ६० मिनिटांच्या निश्चित वेळेत तिथे उपस्थित नव्हती. नियमानुसार, रजिस्टर्ड टेस्टिंग पूल मध्ये समाविष्ट खेळाडूंना रोज एक तास असा सांगावा लागतो, जेव्हा ते कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय चाचणीसाठी उपलब्ध असतील. त्यावेळी विनेश तिथे उपस्थित नव्हती, ज्याला नियमांचे



उल्लंघन मानले गेले. विनेशला ५ जानेवारी २०२६ रोजी याबद्दल सूचित करण्यात आले होते, ज्याचे उत्तर तिने १९ जानेवारी रोजी दिले. विनेशने सांगितले की, ती त्या दिवशी हरियाणा विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात भाग घेण्यासाठी बंगळुरूहून चंदीगडला गेली होती. तिने तिच्या नवीन कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि नुकत्याच झालेल्या बाळाच्या जन्माचाही उल्लेख केला. विनेश म्हणाली की, व्यस्ततेमुळे ती तिचे लोकेशन अपडेट करू शकली नाही. एजन्सीने म्हटले आहे की, एक लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची व्यस्तता आम्ही समजतो, परंतु डोपिंग नियमांचे पालन करणे ही पूर्णपणे खेळाडूची जबाबदारी आहे. नोटीसमध्ये म्हटले आहे की, विनेशकडे एसएमएस, ईमेल किंवा मोबाईल ॲपद्वारे लोकेशन अपडेट करण्याचे अनेक मार्ग होते, ज्यांचा तिने वापर केला नाही.

## हैदराबादने पंजाबचा पराभव करत घेतला बदला; कुपर कॉनोलीचं शतक व्यर्थ; SRHच्या विजयाचं क्रेडिट ३ खेळाडूंना

■ शांघाय/वृत्तसंस्था

सनरायझर्स हैदराबादने पंजाब किंग्सच्या आपल्या घरच्या मैदानावर पराभव केला आहे. या विजयासह हैदराबादने पंजाब किंग्सकडून मागील पराभवाचा बदला घेतला आहे. सलग ३ झेल सोडल्याचा पंजाबला या सामन्यात मोठा फटका बसला, ज्यामुळे हैदराबादचा संघ मोठी धावसंख्या उभारू शकला. शिवाय हैदराबादने गोलंदाजीतही कमाल सुरूवात केल्याने त्यांच्या विजयाचा मार्ग सुकर झाला. या विजयासह हैदराबादचा संघ गुणतालिकेत थेट पहिल्या स्थानी पोहोचला आहे. तर पंजाब किंग्सच्या कुपर कॉनोलीचं टी-२० इतिहासात झळकावलेलं पहिलं शतक व्यर्थ ठरलं.



हैदराबादने प्रथम फलंदाजी करताना टॉप-५ स्फोटक फलंदाजांच्या बळावर २३५ धावांचा डोंगर उभारला. पंजाब किंग्सची गोलंदाजी आणि फिल्डिंग या सामन्यात सुरूवातीला फेल ठरली. यानंतर रनचेस करतानाही पंजाबची सुरूवात खराब झाल्याने कुपर कॉनोलीने शतक करूनही संघ २० षटकांत २०२ धावा करण्यात यशस्वी ठरला.

हैदराबादने दिलेल्या २३६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पंजाब किंग्सची सुरूवात खूप खराब झाली आणि त्यातून संघ सावरू शकला नाही. प्रियांश आर्य पहिल्या षटकात १ धावा करत तर प्रभसिमरन सिंग दुसऱ्या षटकात ३ धावा करत झेलबाद झाले. यानंतर श्रेयस अय्यर ५ धावा करत माघारी परतला. या तीन मोठ्या विकेट्सनंतर मार्कस स्टॉयनिसने कॉनोलीसह संघाचा डाव सावरला. पण स्टॉयनिस २८ धावा करत झेलबाद झाला. तर सूर्यांश शेडगेही २५ धावा करत बाद झाला. एका टोकाकडून विकेट्स पडत असताना कुपर कॉनोली एका टोकाकडून पाय घट्ट रोवून उभा होता. कॉनोलीने सामन्याच्या अखेरच्या षटकात शतक झळकावलं. जे त्याच्या टी-२० कारकिर्दीतील पहिलं शतक ठरलं. कॉनोलीने या सामन्यात ५९ चेंडूत ७ चौकार व ८ षटकारांसह १०७ धावांची खेळी केली. यामुळे पंजाबचा संघ २० षटकांत ७ बाद २०२ धावा करू शकला. हैदराबादकडून पॅट कमिन्स व शिवांग कुमार यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. तर नितीश रेड्डी, इशान मलिंगा, साकिब हुसैन यांनी १-१ विकेट्स घेतल्या. पंजाब किंग्सने सामन्याची नाणेफेक जिंकत हैदराबादला फलंदाजीसाठी पाचारण केलं. हैदराबादची सुरूवात चांगली झाली. ट्रॅव्हिस हेड व अभिषेक शर्माच्या जोडीने संघाला चांगली सुरूवात करून दिली. हेड-अभिषेकने पहिल्या विकेटसाठी ५४ धावांची भागीदारी रचली. अभिषेक शर्मा १३ चेंडूत ३५ धावा करत बाद झाला. तर ट्रॅव्हिस हेड १९ चेंडूत ३८ धावा करत माघारी परतला. यानंतर आलेल्या इशान किशन व हेनरिक क्लासेनच्या जोडीने कमाल केली.

## 'फ्रेंच ओपन स्पर्धेवर बहिष्कार टाकण्याचा खेळाडूंचा इशारा

■ मुंबई)/वृत्तसंस्था


महिला वर्ल्ड नंबर-१ आर्यना सबालेंका यांनी सांगितले की, जर फ्रेंच ओपनमधील बक्षीस रक्कम वाढवली नाही तर खेळाडू स्पर्धेवर बहिष्कार टाकू शकतात. अमेरिकन स्टार कोको गॉफ यांनीही याला पाठिंबा दिला. पुरुष गटातील नंबर-१ खेळाडू जॅनिक सिनर आणि टॉप-१० मधील इतर अनेक खेळाडूंनीही बक्षीस रकमेबद्दल नाराजी व्यक्त केली आहे.

सबालेंका यांचे हे विधान अशा वेळी आले आहे, जेव्हा आयोजक आणि खेळाडू यांच्यात कमाईच्या वाटणीवरून वाद वाढला आहे. या वर्षी फ्रेंच ओपनची बक्षीस रक्कम ९.५ टक्क्यांनी वाढून ६१.७ दशलक्ष युरो (६८६ कोटी रुपये) झाली आहे, पण खेळाडू ती कमी मानतात. खेळाडूंनी सोमवारी दावा केला की, स्पर्धेच्या उत्पन्नातील त्यांचा वाटा २०२४ च्या १५.५ टक्के वरून २०२६ पर्यंत १४.९ टक्के पर्यंत कमी होऊ शकतो. खेळाडूंना उत्पन्नात २२ टक्के वाटा हवा आहे, जो एटीपी आणि डब्लूटीए च्या १ हजार स्तरावरील स्पर्धांच्या बरोबरीचा आहे.

आर्यना सबालेंका म्हणाली, 'आमच्याशिवाय कोणताही टूर्नामेंट होणार नाही आणि कोणतेही मनोरंजनही नाही. मला वाटते की आम्ही निश्चितपणे महसुलाचा जास्त टक्केवारी मिळवण्यास पात्र आहोत. एक वेळ अशी येईल जेव्हा आम्ही याचा बहिष्कार करू. मला वाटते की आपल्या हक्कांसाठी लढण्याचा हा एकमेव मार्ग उरला आहे.

ऑस्ट्रेलियन ओपन, फ्रेंच ओपन, विम्बल्डन चॅम्पियनशिप आणि यूएस ओपनमधून चांगले प्रतिनिधित्व, आरोग्य सुविधा आणि पेन्शनचीही मागणी करत आहेत. त्यांचे म्हणणे आहे की ग्रँड स्लॅम स्पर्धा कोट्यवधींचा नफा कमावतात, परंतु खेळाडूंना त्यांच्या श्रमाच्या प्रमाणात लाभ मिळत नाही.

खेळाडूंच्या तीव्र विरोध आणि संयुक्त निवेदनावर फ्रेंच ओपनच्या आयोजकांनी सध्या कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. टेनिसमध्ये असे मतभेद यापूर्वीही झाले आहेत, परंतु महिला आणि पुरुष गटातील दोन्ही नंबर-१ खेळाडूंचे एकत्र येणे स्पर्धेच्या प्रतिमेवर परिणाम करू शकते.



# प्रेक्षकांची मागणी अन् सुबोधसोबतची मैत्री; पूर्वा गोखलेनं सांगितलं मालिकेत काम करण्याचं कारण

झी मराठीवरील 'वीण दोघांची ही तुटेना' मालिकेत नवीन ट्विस्ट आलाय. या मालिकेत मराठी अभिनेत्री पूर्वा गोखले ची एन्ट्री झाली आहे. अभिनेत्री पूर्वा गोखले ' वीण दोघांतली ही तुटेना ' मालिकेत 'किमया'ची महत्त्वपूर्ण भूमिका साकारणार आहे. किमया ही समरची जुनी मैत्रीण आणि त्याची एक्स-गर्लफ्रेंड आहे. परदेशातून भारतात परतल्यानंतर ती थेट समरच्या घरी राहायला येते. समर आणि किमयामधील जवळीक पाहून स्वानंदीचा जळफळाट होतो.

पूर्वा गोखले यांनी आपल्या भूमिकेबद्दल सांगताना स्पष्ट केल की, 'किमया' ही व्यक्तिरेखा अतिशय मनमोकळी, आनंदी आणि समोरच्या व्यक्तीचा किंवा परिस्थितीचा विचार न करता मनात येईल ते स्पष्टपणे बोलणारी मुलगी आहे. किमया आणि समरची मैत्री खूप जुनी आणि घट्ट असल्याने त्यांच्यातील जवळीक पाहून स्वानंदीच्या मनात जळफळाट निर्माण होताना दिसणार आहे. ४० वर्षांची असूनही किमयाचा उत्साह एखाद्या विशीतल्या मुलीसारखा आहे. पाश्चिमात्य पेहराव आणि बिनधास्त स्वभाव यामुळे हे पात्र प्रेक्षकांसाठी नक्कीच वेगळे आणि मनोरंजक वाटेल.

प्रेक्षकांसाठी सर्वात मोठं आकर्षण म्हणजे सुबोध आणि मी तब्बल १५-१६ वर्षांनंतर छोट्या पडद्यावर एकत्र दिसत आहोत. २०१० मध्ये 'कुलवधू' मालिकेत विक्रमादित्य आणि देवयानी या जोडीने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले होते. तेव्हापासून ही जोडी



पुन्हा एकत्र कधी दिसणार, अशी विचारणा चाहते माझ्याकडे सातत्याने करत होते. मला आशा आहे की, हे भाग प्रेक्षकांना नक्कीच आवडतील. 'वीण दोघातली ही तुटेना' मालिकेचे दिग्दर्शक 'कुलवधू'च्या वेळी सहाय्यक दिग्दर्शक म्हणून कार्यरत होते, त्यामुळे सेटवर मला 'कम्फर्ट झोन' मिळाला. जुनी मैत्री असल्याने सुबोधसोबत काम करताना कोणताही संकोच वाटला नाही.गेल्या काही काळापासून मी हिंदी मनोरंजन सृष्टीत व्यग्र होते, त्यामुळे मराठी प्रेक्षकांपासून काहीशा दूर झाले होते आणि मराठी प्रेक्षक वारंवार मला पुन्हा मराठी मालिकांकडे वळण्याची विनंती करत होते. किमयाच्या निमित्तानं एक सशक्त आणि आव्हानात्मक पात्र मिळाल्यामुळे मी हा रोल स्वीकारला. जेव्हा किमयाच प्रोमो प्रेक्षकांनी पहिला तेव्हा जो उदंड प्रतिसाद मिळाला, त्यावरून ही जोडी आजही प्रेक्षकांच्या तितकीच पसंतीस उतरत असल्याचं सिद्ध झालं आहे.'

## अभिनेत्री नाही तर त्रिशा कृष्णनला व्हायचं होतं क्रिमिनल सायकॉलॉजिस्ट, 'या' क्षेत्रात मिळवल्या आहेत पदव्या

तमिळ आणि तेलुगू चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री त्रिशा कृष्णन सध्या चर्चेत आहे. त्यामागचं कारण म्हणजे तिची आणि विजय थलपती यांची मैत्री. तमिळनाडू विधानसभा निवडणुकीत विजयने मोठा विजय मिळवला. या विजयानंतर त्रिशा त्याला भेटण्यासाठी गेल्याचा व्हिडीओसुद्धा व्हायरल झाला.

त्रिशा व विजय यांची ऑनस्क्रीन केमिस्ट्री अनेकांना आवडते आणि या ऑनस्क्रीन जोडीचे अनेक चाहते आहेत. खऱ्या आयुष्यातसुद्धा दोघे एकमेकांचे चांगले मित्र-मैत्रीण असल्याचं म्हटलं जातं. परंतु, गेल्या काही काळापासून दोघांच्या नात्याबद्दल अनेक चर्चा सुरू आहेत. अशातच काही दिवसांपूर्वी विजयच्या पत्नीने संगीता यांनी घटस्फोटाची याचिका दाखल केल्यानंतर त्यांनी विजयचे लोकप्रिय अभिनेत्रीबरोबर विवाहबाह्य संबंध असल्याचा दावा केला होता. तेव्हापासून विजय आणि त्रिशा यांच्या नात्याबद्दल अनेक चर्चा सुरू झाल्या.

सध्या विजयबरोबरच्या मैत्रीमुळे जरी त्रिशा चर्चेत आली असली तरी अभिनेत्री यापूर्वीसुद्धा तिच्या व्यावसायिक आणि खासगी आयुष्यामुळे चर्चेत आलेली आहे. पण, असं असूनही






तिच्याबद्दलच्या अशा काही गोष्टी आहेत ज्या अनेकांना माहीत नाहीये. यापैकी एक म्हणजे खऱ्या आयुष्यात त्रीशा उच्चशिक्षित असून तिच्याकडे अनेक पदव्या आहेत.

त्रिशा कृष्णनची वेगळी ओळख करून देण्याची गरज नाही. तिचा जन्म ४ मे १९८३ रोजी तमिळनाडूतील चेन्नई येथे झाला. तिने सुरुवातीचं शिक्षण सेक्रेड हार्ट मॅट्रिक्युलेशन स्कूलमध्ये घेतलं. त्यानंतर तिने चेन्नईतील इथिराज कॉलेज फॉर वुमनमधून बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशनमध्ये पदवी प्राप्त केली. मात्र, तिला क्रिमिनल सायकॉलॉजिस्ट बनायचं होतं, पण चित्रपटांमध्ये संधी मिळाल्यामुळे तिने पुढचं शिक्षण सोडलं. मॉडेलिंग करत असताना त्रिशाला चित्रपटांच्या ऑफर्स मिळू लागल्या. तिने १९९९ साली छोट्या भूमिकेतून तमिळ चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं. त्यानंतर हळूहळू तिने तमिळ आणि तेलुगू इंडस्ट्रीमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. तिने अनेक लोकप्रिय अभिनेत्यांसह अनेक हिट चित्रपटांत महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या. यासह तिने हिंदीतही काम केलं आहे. त्रिशा तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही अनेकदा चर्चेत असते. २०१५ साली तिचा उद्योजक वरुण मनियनबरोबर साखरपुडा झाला होता, पण नंतर त्यांचं नातं तुटलं.

## सिद्ध चित्रपट निर्माते आर. बी. चौधरी यांचे जोधपूरमध्ये रस्ते अपघातात निधन

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध निर्माते आर. बी. चौधरी यांचे निधन झाले आहे. जोधपूरमध्ये एका भीषण रस्ते अपघातात त्यांनी आपले प्राण गमावले. त्यांच्या निधनाच्या बातमीने केवळ दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतच नव्हे, तर हिंदी चित्रपटसृष्टीतही धक्का बसला आहे. आर. बी. चौधरी हे प्रसिद्ध अभिनेते जीवा यांचे वडील होते आणि त्यांनी आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत अनेक अविस्मरणीय चित्रपटांची निर्मिती केली. त्यांनी दक्षिणेपासून बॉलिवूडपर्यंत एक मजबूत स्थान निर्माण केले

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी दुपारी जोधपूरमध्ये त्यांच्या कारचा अपघात झाला, ज्यात ते गंभीर जखमी झाले. उपचार मिळण्यापूर्वीच त्यांचे निधन झाले. त्यांच्या टीमने या दुःखद घटनेला दुजोरा दिला आहे. आरबी चौधरी हे प्रादेशिक चित्रपटाला नव्या उंचीवर नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या निर्मात्यांपैकी एक होते. त्यांनी तमिळ, तेलुगू, मल्याळम आणि हिंदी चित्रपटांमध्ये काम केले आणि अनेक यशस्वी प्रकल्प दिले. त्यांच्या चित्रपटांमध्ये मनोरंजन आणि सशक्त कथाकथनाचा उत्कृष्ट मिलाफ दिसून



आला. त्यांच्या सुपर गुड फिल्म्स या निर्मिती संस्थेअंतर्गत निर्मित अनेक चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर उत्कृष्ट कामगिरी केली. नट्टामै, थुल्लथा मनमम थुल्लम आणि सूर्यवंशम यांसारख्या चित्रपटांनी त्यांना एक यशस्वी आणि विश्वासार्ह निर्माता म्हणून स्थापित केले.

## 'प्रोमोही शूट केला आणि न सांगता मालिकेतून रिप्लेस केलं'

मराठी इंडस्ट्रीमध्ये असे अनेक कलाकार आहेत, ज्यांना मालिकेतून किंवा सिनेमातून न सांगता रिप्लेस करण्यात आलं. अनेक कलाकारांनी याबद्दल मुलाखतींमध्ये सांगितलं आहे. अशातच आता आणखी एका अभिनेत्रीनं इंडस्ट्रीमधील असाच एक अनुभव शेअर केलाय.

मराठी अभिनेत्री कुंजिका काळविंटनं 'स्वामिनी' या मालिकेतून इंडस्ट्रीत पदार्पण केलं. 'स्वामिनी' मालिकेनंतर अभिनेत्रीला लीड रोलसाठी मालिका ऑफर करण्यात आलेली. मात्र, तिला अचानक न सांगता रिप्लेस करण्यात आलं. याबद्दल बोलताना कुंजिका म्हणाली की, 'जेव्हा मला समजलं की आता 'स्वामिनी' मालिका बंद होणार आहे, त्याचदरम्यान मी दुसरी एक ऑडिशन दिली होती. त्यात मी सिलेक्ट सुद्धा झाले होते. त्या मालिकेत मी लीड भूमिका साकारणार होते. आता 'स्वामिनी' मालिकेत मी नकारात्मक भूमिका साकारल्यामुळे सुरुवातीला मला टाइपकास्ट होण्याची भीती होती. पण, मला दुसऱ्या मालिकेसाठी जेव्हा लीड भूमिका ऑफर झाली तेव्हा मी निश्चिंत होते. कारण, मला ती निगेटिव्ह इमेज बदलण्यासाठी सुद्धा वेळ मिळाला असता. पण, काही कारणास्तव त्या दुसऱ्या मालिकेच्या गोष्टी जुळून आल्या नाहीत'.कुंजिका पुढे म्हणाली की, 'मी त्या मालिकेसाठी प्रोमो सुद्धा शूट केला होता. पण,ते जुळलं नाही. त्यावेळी मला न सांगता रिप्लेस करण्यात आलं. तेव्हा मला प्रचंड त्रास झाला होता. त्यानंतर मी बराच वेळ घेतला की, आता मला लीड भूमिकाच करायच्या आहेत किंवा सकारात्मक भूमिकाच साकारायच्या आहेत, असंही मी ठरवलं होतं. पण, ते जुळून येत नव्हतं. त्यानंतर मग मला जाणवलं की, आता आपण जास्त वेळ घालवून चालणार नाही. कारण, मी आधीच इंडस्ट्रीत उशिरा आलेय. वयाच्या २७-२८ व्या वर्षी मी पहिली मालिका केली. त्यामुळे मला तेव्हा थांबून राहणं शक्य नव्हतं. कारण, कितीही नाही म्हटलं तरी मुलीचं वय हे दिसतंच. तेव्हा मी ठरवलं होतं,आता जे काम येईल ते घ्यायचं आणि भूमिका साकारायची."मग, मी 'चंद्र आहे साक्षीला' ही मालिका केली. त्यानंतर पुन्हा लॉकडाऊन लागलं. मग, मी 'ती परत आलीये' मालिका केली. या मालिकेत सगळे कलाकार माझ्याच वयाचे होते त्यामुळे मला बऱ्याच गोष्टी शिकता आल्या.' असं अभिनेत्रीनं 'राजश्री मराठी'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये सांगितलं.



# पाणी टंचाई निवारणार्थ बुलढाणा तालुक्यातील मढ गावासाठी टँकर मंजूर

जनसंचलन/बुलढाणा

पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता बुलढाणा तालुक्यातील मढ गावासाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. आदेशात ठरवून दिल्याप्रमाणे नियमित टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती बुलढाणा उपविभागीय अधिकारी यांनी दिली.मढ येथे ४४० पशुधन व २ हजार २५० लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे ७८ हजार ८०० लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर




करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

# महिला व बाल विकास विभागाच्या योजनांचा जिल्हास्तरीय आढावा

जनसंचलन/बुलढाणा

मा. निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत जिल्हास्तरीय आढावा बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत महिला व बाल विकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, बाल संरक्षण विषयक उपक्रम तसेच विभागीय समन्वयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुख अधिकारी उपस्थित होते. महिला व बालकांच्या संरक्षण, पुनर्वसन, शिक्षण, आरोग्य व कल्याणासाठी विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा आढावा यावेळी घेण्यात आला. योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विभागांमध्ये अधिक समन्वय राखण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना करण्यात आल्या. बैठकीदरम्यान बाल संरक्षण, बालविवाह प्रतिबंध, महिला सक्षमीकरण तसेच शिक्षण व आरोग्यविषयक उपक्रम अधिक परिणामकारकपणे राबविण्यासाठी सर्व विभागांनी संयुक्तपणे कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. सदर बैठकीचे सचिव म्हणून जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्री. अमोल दिघोळे यांनी कामकाज पाहिले. बैठकीच्या शेवटी त्यांनी उपस्थित सर्व मान्यवर, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

# मिशन लक्ष्यवेध अंतर्गत ॲथलेटिक्स निवडचाचणी १४ मे रोजी

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत राज्यातील क्रीडा विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या महत्त्वाकांक्षी ङ्कमिशन लक्ष्यवेधफ्र उपक्रमांतर्गत बुलढाणा जिल्ह्यात क्रीडा प्रतिभा विकास केंद्र कार्यान्वित करण्यात येत आहेत. या केंद्रांच्या माध्यमातून जिल्ह्यातील गुणवंत खेळाडूंना ऑलिम्पिक स्तरावरील कामगिरीसाठी तयार करण्यात येणार असून विविध खेळांच्या निवडचाचणी प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. या उपक्रमांतर्गत बुलढाणा जिल्ह्यात ॲथलेटिक्स, आर्चरी, बॅडमिंटन, बॉक्सिंग व वेटलिफ्टिंग या पाच खेळांसाठी प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात येणार आहेत. प्रत्येक खेळ प्रकारासाठी २० खेळाडूंची निवड करण्यात येणार असून त्यांना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. यामध्ये गुणवत्ताधारक प्रशिक्षक, फिजिओथेरपिस्ट, न्यूट्रिशनिस्ट, पूरक आहार, क्रीडा साहित्य, गणवेश, वैद्यकीय चाचण्या तसेच देश-विदेशातील प्रशिक्षणासाठी सहकार्याचा समावेश आहे. त्यानुसार ॲथलेटिक्स खेळाची निवडचाचणी दि. १४ मे २०२६ रोजी सकाळी ७ वाजता जिल्हा क्रीडा संकुल, बुलढाणा येथे आयोजित करण्यात आली आहे. अर्ज सादर केलेल्या तसेच निवडचाचणी देण्यास इच्छुक असलेल्या खेळाडूंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती भक्ती आंग्रे यांनी केले आहे. यापूर्वी निवडचाचणी दिलेल्या खेळाडूंनाही पुन्हा चाचणी देण्याची संधी उपलब्ध राहणार आहे. खेळाडूंनी अर्जासोबत आवश्यक मूळ कागदपत्रे तसेच तीन पासपोर्ट आकाराचे फोटो जोडून कार्यालयात सादर करावेत, असेही आवाहन करण्यात आले आहे.


पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार




सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001



आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणूक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

गुंतवणूकीचा कालावधी मुलींच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

# कॅम्ब्रिज कॉलेज ऑफ फार्मसी च्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठ परीक्षेत घवघवीत यश

**जनसंचलन बुलढाणा**

नुकत्याच जाहीर झालेल्या विद्यापीठ परिक्षेत बी. फार्मसी प्रथम सेमिस्टर च्या निकालात स्व. रामभाऊजी लिंगाडे प्रतिष्ठान संचालित कॅम्ब्रिज कॉलेज ऑफ फार्मसी च्या विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम राखत घवघवीत यश संपादन केले आहे. कॉलेज चा निकाल उच्चांकी लागला असून अनेक विद्यार्थ्यांनी सुवर्ण अक्षरात आपली नावे कोरली आहे. फार्मसी शिक्षण क्षेत्रात अल्पावधीतच आपले वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या कॅम्ब्रिज कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी केवळ उत्तीर्णच नव्हे तर गुणवत्ता यादीत सुद्धा नाव मिळविले आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्रशासनाने आनंद व्यक्त केला. परीक्षेतील या



सुयशामुळे विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे अथक परिश्रम, प्राध्यपकांचे दर्जेदार मार्गदर्शन आणि महाविद्यालयाने उपलब्ध करून दिलेल्या अत्याधुनिक सोयीसुविधांचा मोठा वाट आहे. परिक्षेमध्ये प्रथम स्थानावर मिस अंकिता वाढे (**SGPA** ८.७०), द्वितीय स्थानावर मिस श्रुती देशमुख (**SGPA** ८.३३) असून मिस शिवानी मेहेर (**SGPA** ८.३०) हिने तिसरे स्थान पटकावले आहे तसेच मिस जयश्री जाधव (**SGPA** ८.१९) हि चौथ्या स्थानावर असून मिस श्वेता हेलगे (**SGPA** ८.१५) हिने पाचवे स्थान पटकावले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुशिलकुमार शिंदे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. संस्थेचे अध्यक्ष माननीय पदवीधर आमदार श्री धीरजभाऊ लिंगाडे यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिला आहे. व आमच्या विद्यार्थ्यांचे हे यश म्हणजे त्यांनी केलेल्या कष्टाचे आणि आमच्या संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेचे फळ आहे अशा भावना व्यक्त केल्या

# महिला व चिमुकला बेपत्ता; धाड पोलिसांकडे मिसिंग दाखल

**जनसंचलन/बुलढाणा**





धाड पोलीस स्टेशन अंतर्गत चांडोळ येथील विवाहित महिला व तिचा दोन वर्षीय मुलगा बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी धाड पोलीस स्टेशनमध्ये मिसिंग क्रमांक ०४/२०२६ अन्वये नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सचिन सुनिल देशमुख (वय ३६, रा. चांडोळ ता. जि. बुलडाणा) यांनी २३ एप्रिल २०२६ रोजी धाड पोलीस स्टेशनमध्ये हजर राहून तक्रार दिली. त्यांची पत्नी सौ. वैशाली सचिन देशमुख (वय २४) या १८ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १२ वाजल्यानंतर पांग्री येथील नातेवाईकांकडे ठेवलेले सामान आणण्यासाठी जात असल्याचे सांगून घरातून बाहेर पडल्या होत्या. त्यांच्यासोबत त्यांचा मुलगा श्री सचिन देशमुख (वय २ वर्ष) हाही होता. संध्याकाळपर्यंत त्या घरी परत न आल्याने नातेवाईक व परिसरात शोध घेण्यात आला. मात्र, दोघांचाही ठावठिकाणा लागला नसल्याने अखेर धाड पोलीस स्टेशनमध्ये मिसिंगची नोंद करण्यात आली. हरविलेल्या महिलेचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे : उंची अंदाजे ५.५ फूट, रंग गोरा, केस काळे व वाढलेले. या महिला व बालकाबाबत कोणास काही माहिती मिळाल्यास धाड पोलीस स्टेशनशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास चौकशी अधिकारी शांताराम जाधव, सहायक फौजदार, पोलीस स्टेशन धाड हे करीत आहेत.

# शासकीय निवासी शाळा कोलवड येथे प्रवेश प्रक्रिया सुरू

**जनसंचलन/बुलढाणा**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या अनुसूचित जाती मुलांची शासकीय निवासी शाळा, कोलवड ता. जि. बुलढाणा येथे शैक्षणिक सत्र २०२६-२७ करीता प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सामाजिक आरक्षणानुसार इयत्ता ६ वी ते १० वीतील विद्यार्थ्यांना रिक्त जागांवर प्रवेश देण्यात येणार आहे. सदर निवासी शाळा ही पूर्णतः शासकीय असून विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, पाठ्यपुस्तके, स्टेशनरी तसेच इतर आवश्यक सुविधा मोफत उपलब्ध करून दिल्या जातात. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विजाभज, विमाप्र तसेच दिव्यांग प्रवर्गातील पात्र व इच्छुक विद्यार्थी व पालकांनी प्रवेशासाठी सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, बुलढाणा तसेच अनुसूचित जाती मुलांची शासकीय निवासी शाळा, कोलवड येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त समाज कल्याण बुलढाणा श्री. मनोज मेरत आणि मुख्याध्यापक श्री. एस. व्ही. पहुरकर यांनी केले आहे.







दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८